क्र. ७४/२.३/ज. ०२७६
जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर जिल्हा यांचे
कार्यालय, बी. एस. आर. डी. ए. इमारत,
३ रा मजला, बांद्रे (पूर्व) मुंबई ४०००५१
दिनांक: १०. ३. ९२

प्रति,

विभाग अधिकारी,
के पश्चिम विभाग,
मुंबई महानगर पालिका,
एस. व्ही. रोड, अंधेरी (प.) मुंबई ५८

विषय: जमीन: मुंबई उपनगर जिल्हा
मौजे कोंदिवटा न. भू. क्र. २२१ व १६७
महानगर पालिका यांच्या आरक्षणाखाली
असलेल्या जमिनीस कुंपण घालण्याबाबत
महानगर पालिका यांना परवानगी देणेबाबत.

संदर्भ: तहसिलदार अंधेरी यांचे पत्र क्र. तआ/टे. १/जमिन/
शासकीय जमिन दि. २८. २. ९२

संदर्भाधीन पत्रान्वये तहसिलदार अंधेरी यांनी कळविल्याप्रमाणे मौजे कोंदिवटा न. भू. क्र. २२१ मधील शासकीय जमीन महानगर पालिका यांच्या विकास आराखड्यांत "हॉस्पीटल" या प्रयोजनासाठी आरक्षित आहेत तर न. भू. क्र. १६७ मधील शासकीय जमीन डी. पी. रोड, प्ले ग्राउंड, वेल्फेअर सेंटर या करिता आरक्षित आहे. सदर जमिनीचे अतिक्रमणापासून संरक्षण व्हावे यासाठी त्यास कुंपण घालण्याची परवानगी खालील अटी/शर्तींना अधिन राहून देण्यांत येत आहे.

१) कुंपण घालण्यास देण्यांत येत असलेली परवानगी ही जमीन मंजुरी विषयीच्या शासनाच्या अंतिम निर्णयाधीन राहिल.

२) कुंपण घातल्यामुळे महानगर पालिकेस प्रश्नांकीत जमिनीचे संरक्षण करणे या व्यतिरिक्त कोणताही हक्क प्राप्त होणार नाही.

३) महानगर पालिकेने जमिन हस्तांतरणाबाबतचा (मागणी) बाबतचा प्रस्ताव, प्रश्नांकीत जमिनीबाबतचा नकाशा, क्षेत्र व आवश्यक ते कागदपत्र जोडून या कार्यालयास त्वरीत सादर करण्यांत यावा.

४) प्रश्नांकीत जमिन मंजुरीबाबत शासन ठरविल त्या अटी/शर्ती तसेच हस्तांतरणाबाबतचे ना हरकत प्रमाणपत्र देण्याबाबत हे कार्यालय ठरविल त्या अटी/शर्ती मान्य असल्याबाबतचे हमीपत्र १०/- रुपयां

Scanned by CamScanner

मुद्रांक शुल्कासह वेळेवर या कार्यालयात सादर करावे.

२. वरील बाबी पूर्तता होताच प्रश्नांकीत जमीन महानगरपालिकेस तात्पुरती हस्तांतरीत करण्यात येईल.

सही/-
जिल्हाधिकारी,
मुंबई उपनगर जिल्हा करिता

प्रत:

१) तहसिलदार अंधेरी यांजकडे माहितीसाठी रवाना.
 २. संबंधीत ७/१२ चा उतारा त्वरीत पाठवावा.

२) नगर भूमापन अधिकारी क्र. १६ यांस माहितीसाठी आवश्यक त्या कार्यवाहीसाठी रवाना.
२. प्रश्नांकीत जागेचे निर्मांकन महानगर पालिकेस करून देण्यात येऊन जागेबाबतचे मालमत्ता कार्ड वि उतारे त्वरीत सादर करण्यात यावेत.

३) कार्यकारी अभियंता, विकास नियोजन, महानगर पालिका मुख्य कार्यालय, विस्तारीत इमारत, ४ था मजला, महानगर पालिका मार्ग, फोर्ट, मुंबई ४००००१ यांस माहितीसाठी व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी रवाना.
२. प्रश्नांकीत जागेबाबतचा प्रस्ताव सादर करणे हे आपल्यामार्फत क्रमप्राप्त ठरत असल्यास तो या कार्यालयात सादर करावा.

स्थळप्रतीवर मा.
जिल्हाधिकारी यांची
सही आहे.

१०/३/९२

जिल्हाधिकारी,
मुंबई उपनगर जिल्हा करिता

लेखप्र. १०३९२

ISSUED ON 10/3/92